**आकाशवाणी मुंबई**

**राष्ट्रीय बातम्या देत आहे.**

**ठळक बातम्या**

- सरकारी जमिनींवरच्या अतिक्रमणाला जबाबदार असलेल्या महसूल विभागाच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याचा राज्य सरकारचा विचार

- हैदराबादमध्ये बनावट मद्य प्राशन केल्यामुळं ७ जणांचा मृत्यू, ५१ जणांवर उपचार सुरू

- ॲक्सिओम-४ मोहिमेतले भारतीय अंतराळवीर शुभांशू शुक्ला यांचा परतीचा प्रवास १४ जुलैला सुरू होणार

**आणि**

- विम्बल्डनमध्ये पुरुष एकेरीच्या उपांत्य फेरीत आज जोकोविच, यानिक सिनर, अल्काराज यांचे सामने

**<><><><><>**

राज्यातल्या सरकारी जमिनींवर अतिक्रमण करून अनधिकृत बांधकाम करण्यासाठी जबाबदार असणाऱ्या महसूल विभागाच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यासाठी विचार सुरू आहे अशी माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज विधानसभेत दिली.

राज्यातील वन विभागाच्या बाहेर असणाऱ्या बफर झोनमधल्या शेतजमिनी वार्षिक भाड्याने घेऊन त्यावर सौर ऊर्जा प्रकल्प अथवा सुगंधी गवत लावलं जाईल, अशी माहिती वन मंत्री गणेश नाईक यांनी दिली. जंगली प्राण्यांच्या भीतीमुळे याठिकाणी शेती होत नसल्याचा मुद्दा सुलभा खोडके यांनी उपस्थित केला होता.

वन विकास महामंडळाकडून वार्षिक पन्नास हजार रुपये भाड्याने घेऊन त्यावर हे प्रकल्प राबविण्यात येतील, महसूल आणि वन विभागाने एकत्रितरित्या हा निर्णय घेतल्याचं वनमंत्री म्हणाले.

एमपीएससीनं घेतलेल्या लिपिक आणि टंकलेखक परीक्षेचा निकाल लवकरच जाहीर होणार आहे. या परीक्षेच्या संदर्भात काही विद्यार्थ्यांनी मॅटमध्ये याचिका दाखल केली होती. मॅटनं तोंडी निकाल दिला आहे. त्यांचा निकाल अधिकृतरित्या जाहीर झाल्यावर यशस्वी विद्यार्थ्यांची यादी जाहीर करू, अशी माहिती मंत्री आशिष शेलार यांनी विधानसभेत लक्षवेधी सूचनेच्या दरम्यान दिली. स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी प्रतिभासेतू नावाचा नवा प्रकल्प राबवण्यात येईल, अशी घोषणाही त्यांनी यावेळी केली.

**<><><><><>**

MHT -CET अर्थात महाराष्ट्र राज्य सामायिक प्रवेश परीक्षेत २७ एप्रिल २०२५ रोजी झालेल्या परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेत २१ प्रश्नांमध्ये त्रुटी आढळून आल्या आहेत. त्यामुळे यासाठी जबाबदार असलेल्या तीन सदस्यीय समितीची सेवा खंडित करण्यात आली आहे, अशी माहिती उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी विधान परिषदेत दिली. प्रश्नोत्तराच्या तासाला आमदार अभिजीत वंजारी यांनी या संबंधीचा प्रश्न उपस्थित केला होता. विभागाकडून आता सीओईपी तंत्रशास्त्र विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुनील भिरुड यांच्या अध्यक्षतेखाली ७ सदस्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांची कार्यकक्षा प्रश्नपत्रिका संच बनवणे, तज्ञांची नियुक्ती आदी जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे. २७ एप्रिल च्या परीक्षेला २७ हजार ८२६ विद्यार्थी बसले होते, त्यांची फेर परीक्षा घेण्यात आल्याची माहितीही मंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिली.

**<><><><><>**

एक राष्ट्र एक निवडणूक याबाबतच्या संयुक्त संसदीय समितीची बैठक संसद भवनात सुरू आहे. या बैठकीत भारताचे माजी सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड तसंच न्यायमूर्ती जगदीश सिंग खैहर समितीसमोर सादरीकरण करतील.

**<><><><><>**

हैदराबादच्या कुकटपल्ली भागात बनावट मद्य प्यायल्यामुळे मृत्युमुखी पडलेल्यांची संख्या आता सात झाली आहे, बाधितांपैकी दोघांचा काल रात्री मृत्यू झाला. आतापर्यंत ५१ जणांना रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. कुकटपल्ली आणि आसपासच्या परिसरात ६ आणि ७ जुलै ला हे मद्य प्यायलेल्या लोकांना कमी रक्तदाब, चक्कर येणे आणि थकवा यासारख्या लक्षणांमुळे रुग्णालयांमध्ये दाखल करण्यात आलं आहे.

**<><><><><>**

अंमली पदार्थ प्रकरणातला आरोपी कुब्बावाला मुस्तफा याला संयुक्त अरब अमिरातहुन भारतात आणण्यामध्ये सीबीआयला यश आलं आहे. सांगलीत सिंथेटिक ड्रग्ज उत्पादन यंत्रणा चालवल्याचा आरोप मुस्तफावर आहे. कुब्बावाला मुस्तफा आणि इतरांशी संबंधित असलेल्या कारखान्यातून २५ लाख रुपयांहून अधिक किमतीचे एकूण १२६ किलो मेफेड्रोन ड्रग्ज जप्त करण्यात आलं आहे.

**<><><><><>**

पंजाब मंत्रिमंडळाने १० लाख रुपयांपर्यंतचे कॅशलेस वैद्यकीय उपचार देण्यासाठी मुख्यमंत्री सेहत योजनेला मान्यता दिली आहे. ही योजना येत्या २ ऑक्टोबरपासून सुरू होईल. या योजनेअंतर्गत नागरिकांना सामान्य सेवा केंद्रांवर आरोग्य कार्ड दिले जाणार आहेत. याव्यतिरिक्त नागरिकांना आधार कार्ड किंवा मतदार ओळखपत्र वापरून आरोग्य कार्ड मिळवण्यासाठी ऑनलाइन नोंदणी करता येईल. पंजाबमधल्या तीन कोटी नागरिकांना याचा लाभ होणार आहे.

**<><><><><>**

भारतीय रेल्वे सुरक्षा वाढवण्यासाठी नवीन निरीक्षण प्रणाली सुरू करत आहे. ही निरीक्षण प्रणाली कृत्रिम बुद्धिमत्ता आणि मशीन लर्निंग तंत्रज्ञानावर आधारित आहे. ही प्रणाली चालत्या रेल्वे गाड्यांच्या फोटोवरुन अनियमितता असलेल्या सुट्या भागांची माहिती दुरुस्ती यंत्रणांना देते. यामुळं संभाव्य अपघात टाळण्यात मदत होईल.

<><><><>

श्रावण महिन्यातल्या प्रसिध्द कावड यात्रेला आजपासून उत्तराखंड मधे सुरुवात झाली. ही कावड यात्रा २३ जुलैपर्यंत सुरू राहणार आहे. अनेक यात्री हरिद्वार, ऋषिकेश, नीलकंठ आणि इतर तीर्थक्षेत्रांकडून गंगाजल आणण्यासाठी निघाले आहेत.

<><><><>

अमरनाथ यात्रेत आतापर्यंत पवित्र गुहेत दर्शन घेतलेल्या यात्रेकरूंची एकूण संख्या १ लाख ४५ हजार ७१६ झाली आहे. ३ जुलैपासून सुरू झालेल्या यात्रेच्या आठव्या दिवशी काल एकूण १७ हजार २२ यात्रेकरूंनी गुहेत दर्शन घेतलं. यावर्षीच्या यात्रेसाठी ४ लाखांहून अधिक यात्रेकरूंनी ऑनलाइन नोंदणी केली आहे, जी ९ ऑगस्टला संपणार आहे. गेल्या वर्षी ५२ दिवसांच्या यात्रेत ५ लाखांहून अधिक यात्रेकरूंनी दर्शन घेतलं होते.

<><><><>

भारतात युपीआयचा वापर मोठ्या प्रमाणात होत असल्यानं इतर देशांच्या तुलनेत भारतानं वेगानं पैसे हस्तांतर होत असल्याचं आंतरराष्ट्रीय नाणेनिधीनं म्हटलंय. युपीआयमुळं भारतातल्या डिजिटल व्यवहारांमध्ये आमुलाग्र बदल झाले आहेत. या माध्यमातून महिन्याला १८ अब्ज व्यवहार होत असल्याचं नाणेनिधीनं नमूद केलं आहे.

<><><><>

ॲक्सिओम-४ मोहिमेतील भारतीय अंतराळवीर ग्रुप कॅप्टन शुभांशू शुक्लासह इतर तीन सदस्यांचा परतीचा प्रवास १४ जुलै रोजी सुरू होणार असल्याचं नासानं जाहीर केलं आहे. हे यान पॅसिफिक महासागरात कॅलिफोर्नियाच्या किनाऱ्याजवळ उतरवण्यात येईल. ग्रुप कॅप्टन शुक्ला आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकात १४ दिवसांच्या मोहिमेवर आहेत. ते आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकाला भेट देणारे पहिले तर अवकाशात मोहिमेस जाणारे दुसरे भारतीय अंतराळवीर ठरले आहेत. ग्रुप कॅप्टन शुक्ला यांनी खास भारतासाठी असे सात वैज्ञानिक प्रयोग केले.

**<><><><><>**

पाकिस्तानमधल्या बलुचिस्तान प्रांतात काल संध्याकाळी अज्ञात बंदूकधारींनी नऊ बस प्रवाश्यांची गोळ्या घालून हत्या केली. हे प्रवासी पूर्व पंजाब प्रांतातून येत असल्याची ओळख पटवून बस मधून त्यांचं अपहरण करून त्यांची हत्या करण्यात आली. अदयाप कोणत्याही दहशतवादी गटाने या घटनेची जबाबदारी स्वीकारली नसली तरी, बलुच लिबरेशन आर्मी बंडखोरांनी ही हत्या केल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.

**<><><><><>**

विम्बल्डनमध्ये पुरुष एकेरीच्या उपांत्य सामन्यात आज नोव्हाक जोकोविच याच्यासमोर अग्रमानांकित यानिक सिनर याचं आव्हान असेल, तर दुसऱ्या सामन्यात कार्लोस अल्काराज आणि टेलर फ्रिट्झ आज एकमेकांविरुद्ध मैदानात उतरतील.

महिला एकेरीत काल झालेल्या उपांत्य सामन्यात अमांडा अनिसिमोव्हा हिनं अग्रमानांकित अरीना साबालेंका हिला पराभवाचा धक्का दिला. अटीतटीच्या सामन्यात अमांडा हिनं अरीना हिच्यावर ६-४, ४-६, ६-४ अशी मात केली. अजिंक्यपदासाठी आता तिच्यासमोर इगा श्वियांतेक हिचं आव्हान असेल. इगा हिनं

बेलिंडा बेंचिच हिच्यावर ६-२, ६-० असा विजय मिळवला. मिश्र दुहेरीत कॅतरीना सिनियाकोव्हा आणि सेम व्हरबीक या जोडीनं जो सॅलिसबरी आणि लुईसा स्टेफनी या जोडीचा ७-६, ७-६ असा थेट सेट्समध्ये पराभव करून अजिंक्यपदावर नाव कोरलं.

<><><><><>

अँडरसन-तेंडुलकर कसोटी मालिकेतल्या तिसऱ्या सामन्यातल्या दुसरा दिवसाचा खेळ आज दुपारी साडे तीन वाजता सुरू होईल. पहिल्या दिवसअखेर इंग्लंडच्या चार बाद २५१ धावा झाल्या होत्या. भारताकडून नितीश कुमार रेड्डीने दोन, तर रविंद्र जडेजा आणि जसप्रित बुमराहनं प्रत्येकी एक गडी बाद केला.

//<><><><><>//